गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली

# राष्ट्रीय सेवा योजना

### ग्राम विकासाकरीता - “युवाशक्ती”

**दिनांक ०१ ते ०७ डिसेंबर २०१७**

**(महाविद्यालयीन विशेष शिबीर)**

## “शिबीर अहवाल”


**-: सादरकर्ते :-**

**प्रा. अमर सुभाष कुरील**

**रा.से यो. कार्यक्रम अधिकारी**

**शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली**


**२०१७-२०१८**




# राष्ट्रीय सेवा योजना

**ग्राम विकासाकरीता –"युवाशक्ती"**

**दिनांक ०१ ते ०७ डिसेंबर २०१७**

**(महाविद्यालयीन विशेष शिबीर)**

**"रा.से.यो. कार्यक्रम पत्रिका"**



गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

राष्ट्रीय सेवा योजना

शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली

ग्राम विकासाकरीता-'युवाशक्ती'

महाविद्यालयीन विशेष शिबीर

दिनांक : ०१ ते ०७ डिसेंबर २०१७

स्थळ : जि.प. उच्च प्राथ. शाळा, येवली, ता. जि. गडचिरोली

- संयोजक -

शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली

सस्नेह निमंत्रण

व

कार्यक्रम पत्रिका

प्रति,

श्री/श्रीमती

बुधवार दि. ०६/१२/२०१७

सकाळी १०.०० वा. : निरोप समारंभ

हस्ते : डॉ. नरेश मडावी

रा.से.यो.समन्वयक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रमुख अतिथी : डॉ. जि.एल. वाघमारे, प्राचार्य

शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली

गुरुवार दि. ०७/१२/२०१७

प्रस्थान

* शिबीराची वैशिष्ट्ये *

* प्रार्थना * श्रमदान * जनजागरण

* व्यसनमुक्ती * आपत्ती व्यवस्थापन * जल संवर्धन कार्य

* स्वच्छता अभियान * सांस्कृतिक कार्यक्रम * ग्रामिणांकरीता कला आणि खेळ

* संयोजक *

प्रा. अमर कुरील
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
मो. : ७५०७३६३३२०

डॉ. जि.एल. वाघमारे
प्राचार्य
मो. : ९९७००३१३२८

डॉ. चंद्रगुप्त दुधे

डॉ. सुनिल गणात्रा

डॉ. अशोक कळवे

डॉ. विवेक राऊत

डॉ. महेश साळुंके

डॉ. मंदार पेंणकर

डॉ. सय्यद अबरार अहमद

सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी

* नियोजन समिती *

* ग्रामपंचायत समिती येवली, जि. गडचिरोली *

* जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली *

* जिल्हा परिषद शाळा, गडचिरोली *

* नेहरू युवा केंद्र संगठन, गडचिरोली *

* राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यापीठस्तरीय शिबीर समिती *

* शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली *

**सप्रेम नमस्कार,**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने **राष्ट्रीय सेवा योजना** अंतर्गत महाविद्यालयीन **'विशेष शिबीराचे'** आयोजन दि. ०१ डिसेंबर ते ०७ डिसेंबर २०१७ ला करण्यात आलेले आहे. तरी आपण या शिबीरास भेट देवून शिबीरार्थींना प्रोत्साहित करावे, ही विनंती.

## ✻ दैनंदिन कार्यक्रम ✻

| | | |
|---|---|---|
| सकाळी ५.०० ते ६.०० वा. | : | सकाळी उठणे व मुलांची तयारी |
| सकाळी ६.०० ते ७.०० वा. | : | योगा व कवायत |
| सकाळी ७.०० ते ७.३० वा. | : | सामुहिक प्रार्थना |
| सकाळी ७.३० ते ८.०० वा. | : | अल्पोपहार |
| सकाळी ८.०० ते १२.०० वा. | : | श्रमदान |
| दुपारी १२.०० ते १.०० वा. | : | भोजन |
| दुपारी १.०० ते ३.३० वा. | : | व्याख्यान |
| दुपारी ३.३० ते ४.३० वा. | : | चर्चासत्र |
| दुपारी ४.३० ते ५.०० वा. | : | चहापान |
| दुपारी ५.०० ते ६.०० वा. | : | खेळ सत्र |
| सायं. ७.०० ते ८.०० वा. | : | सांस्कृतिक कार्यक्रम |

## शुक्रवार दि. ०१/१२/२०१७

### आगमन

१) शिबीरार्थी नोंदणी
२) शिबीर उभारणी
३) शिबीरार्थींना मार्गदर्शन
४) परिसर माहिती
५) परिसर स्वच्छता
६) सांस्कृतिक कार्यक्रम

## शनिवार दि. ०२/१२/२०१७

| | | |
|---|---|---|
| सकाळी १०.०० वा. | : | **उद्घाटन सोहळा** |
| शुभहस्ते | : | मा. श्री अशोक नेते<br>खासदार चिमूर – गडचिरोली लोकसभा क्षेत्र, गडचिरोली |
| अध्यक्ष | : | डॉ. जि. एल. वाघमारे, प्राचार्य<br>शासकिय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली |
| प्रमुख अतिथी | : | मा. श्रीमती गिताताई सोमनकर, सरपंच येवली<br>व इतर ग्रामपंचायत सदस्य<br>मा. छाया मुपीडवार, प्र. मुख्याध्यापिका<br>जि. प. उच्च प्राथ. शाळा, येवली |
| दुपारी २ ते ३.०० | : | चर्चा सत्र – होय, आम्ही किटकनाशकाच्या अनुचित वापरामुळे होणाऱ्या शेतकरी प्राणहाणी थांबवू शकतो. |

## रविवार दि. ०३/१२/२०१७

| | | |
|---|---|---|
| दुपारी १ ते २.०० | : | व्याख्यान – विषय : शासकिय योजनांना जनसहभागाची साथ<br>वक्ते : श्री संजय लांजेवार,<br>अनुलोम मुंबई, उपविभाग प्रमुख, गडचिरोली |
| दुपारी २ ते ३.३० | : | व्याख्यान – विषय : शारिरीक सुदृढता व विद्यार्थी जिवन<br>वक्ते : डॉ. अशोक कळंबे<br>सहा. प्राध्यापक, शास. विज्ञान महा., गडचिरोली |
| दु. ३.३० ते ४.३० | : | वादविवाद स्पर्धा – नोटबंदी – योग्य किंवा अयोग्य |

## सोमवार दि. ०४/१२/२०१७

| | | |
|---|---|---|
| दुपारी १ ते २.०० | : | व्याख्यान – विषय : रा.से.यो. व व्यक्तीमत्व विकास<br>वक्ते : प्रा. अविनाश पंधरे<br>सहा. प्राध्यापक, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा |
| दुपारी २ ते ३.३० | : | व्याख्यान – विषय : GST चे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>वक्ते : डॉ. प्रिया गेडाम, सहा. प्राध्यापिका<br>वाणिज्य विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |
| दु. ३.३० ते ४.३० | : | वक्तृत्व स्पर्धा – सामाजिक माध्यमांचा वापर |

## मंगळवार दि. ०५/१२/२०१७

| | | |
|---|---|---|
| दुपारी १ ते २.०० | : | व्याख्यान – विषय : आदिवासी महिला आणि पोषण<br>वक्ते : डॉ. योगिता सानप, सहा. प्राध्यापिका<br>(गृहविज्ञान) कृषी विज्ञान केंद्र, गडचिरोली |
| दुपारी २ ते ३.३० | : | व्याख्यान – विषय : स्वामी विवेकांनद यांचे विचार<br>वक्ते : श्री अखिलेश मिश्रा, नेहरु युवा केंद्र, गडचिरोली |

**गोंडवाना विद्यापिठ,गडचिरोली**
**शासकिय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**ग्राम विकासा करीता- 'युवाशक्ती'**
**महाविद्यालयीन विशेष शिबिर**
**दिंनाक -०१ ते ०७ डिंसेबर २०१७**
**स्थळः जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळा,येवली**

## 'शिबीर अहवाल'

गोंडवाना विद्यापीठ ,गडचिरोली आणि शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यामाने, ग्राम विकासाकरीता 'युवाशक्ती'या संकल्पने वर आधारित 'राष्ट्रीय सेवा योजना' च्या महाविद्यालयीन विशेष शिबीराचे आयोजन जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळा, येवली तालुका- गडचिरोली, जिल्हा गडचिरोली इथे दिंनाक ०१ ते ०७ डिंसेबर २०१७ या कालावधीत करण्यात आले.

- **शुक्रवार,दिनांक ०१ डिंसेबर २०१७ : 'आगमण'**

सर्व महाविद्यालयीन शिबीरार्थीचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी सोबत ठरलेल्या स्थळी म्हणजेच महाविद्यालयाचे दत्तक गाव येवली,तालुका,गडचिरोली जिल्हा-गडचिरोली येथे दुपारी आगमण झाले. दत्तक गाव येवली चे महाविद्यालयापासुनचे अंतर एकुण १३ किमी इतके आहे.या दिवशी शिबीरार्थीची नोंदनी आणि शिबीर उभारनी, शिबिरार्थीना मार्गदर्शन, परिसर माहीती,परिसर स्वच्छता व सांयकाळी सांस्कृतिक कार्यक्रम असे काही ठळक व महत्वाचे कार्य पार पडले.

- **शनिवार,दिनांक ०२ डिंसेबर २०१७ : 'उद्घाटन सोहळा'**

गोंडवाना विद्यापीठ ,गडचिरोली आणि शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यामाने, ग्राम विकासाकरीता 'युवाशक्ती'या संकल्पने वर आधारित 'राष्ट्रीय सेवा योजना' च्या महाविद्यालयीन विशेष शिबीराचे आयोजन जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळा, येवली तालुका,गडचिरोली-जिल्हा गडचिरोली इथे-दिंनाक ०१ ते ०७ डिंसेबर २०१७ या कालावधीत करण्यात आले.सदर शिबिराचे उद्घाटन दिनांक ०२ डिंसेबर २०१७ रोजी करण्यात आले व त्यासाठी अध्यक्षीय स्थानी डॉ जि.एल वाघमारे,प्राचार्य शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली प्रमुख अतिथी डॉ सुनिल गणात्रा ,सहयोगी प्राध्यापक (रसायनशास्त्र),प्रा.अमर कुरील,रासेयो कार्यक्रम अधिकारी,डॉ.मंदार पैगनकर,डॉ.अबरार अहमद, श्रीमती गीताताई सोमनकर,सरपंच येवली, श्रीमती मुप्पीडवार मुख्यध्यापिक ,जि.प.उच्च प्राथ.शाळा,येवली,श्री भांडेकर सदस्य ग्रामपंचायत येवली,श्रीमती प्रितीताई बारसागडे,ग्राम निवासी येवली इत्यादी मंडळी उपस्थीत होती.

प्रा.अमर कुरील यांनी सदर शिबिराची प्रस्तावना माडंली.

प्रमुख अतिथी डॉ.सुनिल गणाजा यांनी शिबिरार्थ्यांना या प्रसंगी काही ठळक मुलभुत गोष्टीची जाणीव करुन दिली. महाविद्यालयीन शिक्षणासोबतच एक वेगळा सामाजिक बांधीलकी, समाज सेवा म्हणुन रा.से.यो.हे उपक्रम अंगिकाराबद्दल सर्व रासेयो शिबीरार्थीचे स्वागत कौतुक केले. शहरी जिवनातुन ग्रामिन जिवनाकडे वळण्यासाठी आपण रासेयो हे माध्यम निवडुन,ग्रामीन जिवन समजुन घेण्यासाठी व तेथिल काही मुलभुत समस्या याचे सात दिवसात आपल्या या शिबिराच्या माध्यमातुन त्या समस्यांचे काही निराकारण करता येईल का..? असा प्रश्न उपस्थित केली. तसेच प्रा.कुरील यांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्व शिबीरार्थी काही ग्राम विधायक कार्य कराल अशी अपेक्षा बाळगली.सर्व शिबीरार्थीना या महाविद्यालयीन सात दिवसीय शिबीरासाठी शुभेच्छा दिल्या.

श्रीमती सोमणकर,सरपंच यांनी मागील सदर दोन वर्षात झालेल्या या विशेष शिबीरामार्फत झालेल्या कार्याचा आढावा घेत या सर्व शिबीरार्थीना शुभेच्छा दिल्या व शाळेच्या परीसरातील व आरोग्य प्राथ.केंद्र,येवली या भागातील परीसर स्वच्छतेबद्दलच्या अपेक्षेतील सहकार्य करण्याची इच्छा प्रगट केली. मागील दोन वर्षात शास.विज्ञान महा. च्या रासेयो पथकाद्वारे झालेल्या कामाचे त्यांनी अभिनंदन केले व सर्व शिबिरार्थीना शुभेच्छा दिल्या.

श्रीमती छाया मुप्पीडवार यांनी शाळेत निवासी राहून सलग सात दिवस या शाळेच्या मुलांसाठी आपण केलेला कार्य व आपले बौध्दीक उपक्रम यातुन या शाळेचे विद्यार्थी नक्कीच प्रभावीत होतील व त्यांना पुढील उच्च शिक्षणाची आवड निर्मान होईल असे यांनी सांगीतले सर्व शिबिरार्थीचे आगमनाबद्दल आभार मानले व यांनी शिबिरासाठी सर्व शिबीरार्थीना शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय स्थानी लाभलेले डॉ.वाघमारे सर यांनी मुलभुत आवश्यक बाबींवर लक्ष केंद्रीत केल्यास एखाद्या मोठया अपेक्षाचे शिखर गाठता येत असल्याचे प्रतिपादन आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगीतले. देशांचा विचार करतांना मोठया-मोठया शहरासोबत लहान लहान खेडे-गावांचा विकास सुध्दा झाला पाहीजे. त्यांच्या समस्या,निरक्षरता,विज्ञानाची प्रगती,अंधश्रध्दा निर्मृलन,स्वच्छता, मुलींचे शिक्षण इत्यादी बाबींवर शिबिरातील कार्यक्रमात व गावात रॅली,पथनाटक घेउन समाजविख्याचे सांगीतले.ही युवाशक्ती कोणत्याही बाबतीत कमी नाही व सर्व समस्याचे विचार व मंथन करुन योग्य उपायात्मक कार्य सिध्द होऊ शकत असल्याचे सांगीतले व सर्व शिबिरार्थीना या विशेष शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

या उद्घाटन सोहळयाचे संचालन कु.सेजल राजगडकर व आभार प्रदर्शन निकेष भरणे यांनी केले.






**महाविद्यालयीन 'विशेष शिबीराचे' उद्‌घाटन करतांना डॉ.जि.एल.वाघमारे,प्राचार्य**







**महाविद्यालयीन विशेष शिबीराच्या प्रसंगी उपस्थीत इतर मान्यवर**

- **शनिवार, दिनांक ०२ डिसेंबर २०१७ : 'चर्चासत्र' (मध्यान्न बौध्दिक सत्र)**

महाविद्यालयीन विशेष शिबीरात दुपारच्या सत्रांत 'होय,आम्ही किटक नाशकाच्या अनुचीत वापरामुळे होणा-या शेतकरीची प्राणहाणी थांबवू शकतो' या एका ज्वलंत मुद्दयावर एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.अमर कुरील,रासेयो कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. या चर्चासत्रात अति संवेदनाशिल व परीस्थीती दर्शविणारा विषय चर्चासत्रात ठेवण्यात आला.या सदर विषयावर सर्व सामाजिक माध्यमावर चर्चेला उधाण आलेले होते. तरी सर्व शिबिरार्थीना या चर्चासत्रात भाग घेण्यासाठी अनिवार्य करण्यात आले व त्यांना या चर्चासंत्रात आपले विचार मांडण्यासाठी प्रात्साहीत करण्यात आले.

काही विद्यार्थ्यांनी किटकनाशाबद्दलची माहीती दिली. काहींनी शेतकरीच्या अज्ञानतेचे त्यांचे निष्काळजी पणांचे व काही उपचार वेळेवर न केल्या मुळेच शेतक-यांनी प्राण गमवल्याचे सांगीतले. कोणते किटकनाशक कुठे आणि कसे वापरायला पाहीजे यावर सुध्दा बोलले. उल्लेखनीय सुचनांचे पालन न केल्याचे सांगीतले व अशे विविध मुद्दे विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात उपलब्ध केले.

चर्चासत्राचे अध्यक्ष प्रा.अमर कुरील यांनी या चर्चासत्राचे गांभीर्य अतिशय मार्मिकतेने सर्व शिबीरार्थ्यांना व ग्रामवासीयांना सांगीतले. आपण आपल्या शेतीतील उभ्या पिंकाचे रक्षन करण्यासाठी बाजारातुन जे रसायन अर्थातच जे एक विष आहे, ज्याला आपण किटकनाशक म्हणतो तो त्या किटकांना प्राण घातक आहे. त्याच प्रमाणे मानवी शरीराला सुध्दा आहे असे इथे सांगीतले. सदर किटकनाशकाबद्दलची माहीती ही शेतक-याने बि-बियाने केंद्र,ॲग्रो सेंटर, किटकनाशक दुकाने यांच्या मार्फत कळून घेणे अत्यावश्यक असल्याचे सांगीतले.सदर किटकनाशकांचे वापराचे प्रमाण,कशात घेणे,सकाळी-सायंकाळी फवारण्याचे ज्ञान,योग्य आवश्यक खबरदारी शरिर झाकण्यासाठी आवश्यक कोट, प्रथमोपचार,प्रतिबधांत्मक उपाय,रसायनांची घातकता ,मानवी शरीरावर तसेच वनस्पती,प्राणी मनुष्य व निसर्गातील अन्न साखळीद्वारे कशे जुळून आहेत व त्यांचा विपरीत परीणाम कसा होऊ शकतो हे प्रा.कुरील सरांनी उदाहरणासह चर्चासत्राच्या अध्यक्षिय मार्गदर्शनात स्पष्ट केले.या शेतकरी प्राणहानीला काही विशेष राजकीय रंग लागल्याचे सुध्दा दिसल्याचे सांगीतले पण त्यातुन काही साध्य न झाल्याचे कळले.

स्वतःचे योग्य ज्ञान,प्रात्यक्षीक,आवश्यक खबरदारी व सपुर्ण माहीती हेच किटकनाशकाच्या होणा-या हाणीकारक प्रभावापासुन तुमचा जिव वाचवु शकतो,असे सांगितले.

सदर चर्चासत्राचे संचालन प्रतीक मेश्राम व आभार प्रदर्शन हर्षल चिलबुले यांनी केले.





**चर्चासत्रांत सामील शिबिरार्थी**

- **रविवार,दिंनाक ०३ डिंसेबर २०१७ : 'घोषवाक्य स्पर्धा'**

शिबिराच्या दुपारच्या सत्रात घोष वाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेत शिबिरार्थीनी उत्सहात भाग घेतला.

शिबिरार्थीनी नाना-विध घोष वाक्य तयार केली आणि त्यामागची संकल्पना सुध्दा स्पष्ट केली 'बेटी बचाओ-बेटी पढाओ', 'बिटीया रानी सबसे सयानी', 'मुलगी शिकली प्रगती झाली', ' शिकलेली आई घरा दाराला पुढे नेई ',' मुलगा पेक्षा मुलगी बरी- प्रकाश देते दोन्ही घरी'.

जिच्या हातात पाडण्याची दोरी- तिच जगाला उद्धारी असे बहुउपयोगी प्ररणादायक घोष वाक्य शिबिरार्थीनी तयार केलीत आणि त्यांच्या मागची संकल्पना उदाहरणासहीत स्पष्ट केली. उदा बेटी-(खेळालया लावा) 'बेटी खिलाओ' याला एका शिबिरार्थीनी 'बेटी पढाओ, बेटी बचाओ आणि बेटी खिलाओ 'जसे मध्य भारतातील २०१६ मध्ये त्यांनी रिया ओलम्पिक असे सुध्दा अद्यावत केले. कांस्य पदक जिकंणारी कु.साक्षी मल्लीक(पहलवाण) पहीली महीला चा आवर्जुन उल्लेख केला .रियो ओलम्पिंक ज्या मध्ये भारताला पुरुष गटाला निराशा आली त्यामध्ये देशाच्या एका मुलीने पदक पटकविले आणि भारताची लाज अख्या जगात राखली. भारत देशाचे नाव सपुर्ण देशभरातुन साक्षी मल्लीक ची यशाची लौकीक केले आणि जगात भारताचा ध्वज उंचावला व प्रशंसा करण्यात आली.सिधु या महिलेने सुध्दा द्रितीय सी.वी याच मध्ये बॅटमिटन खेळाळु पी.याची सुध्दा दखल घेण्यात आली आणि सिंधुनी सर्व स्थान पटकावित रजत पदक काबीज केले. या स्तरावरुन स्तुती करण्यात आली.

या दुपारच्या सत्रासाठी अध्यक्ष प्रा. कुरील सरांनी सुध्दा आज भारतीय समाजात महीलांचा प्रमुख स्थान विद्यार्थ्याना अवगत करुन दिले. भारतात व त्यांचे शिक्षणातुन होणारा सर्वागिन विकास स्पष्ट केला. महीलांनी रियो आलंपिक २०१६ मधील दैंदिप्यमान कार्याचे महत्व व मेहनत स्पष्ट केले तसेच त्यातुन मुख्यता मुलीनां प्रेरणा घेण्यास सागिंतले.

या कार्यक्रमाचे संचालन कुमारी अदिती उप्परवार आणि आभार प्रदर्शन कुमारी भाग्यश्री साहारे यांनी केले.






**घोषवाक्य स्पर्धेत सामील शिबिरार्थी**

- **रविवार, दिनांक ०३ डिसेंबर २०१७ : 'व्याख्यान'**

दुपारच्या पहील्या सत्रांत श्री.संजय लांजेवार,अनुलोम मुंबई,उपविभाग प्रमुख गडचिरोली यांचे 'शासकीय योजनांना जनसहभागाची साथ ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.भारतात महाराष्ट्र राज्याची स्थापना ०१ मे १९६० मध्ये करण्यात आली. शासन हे लोकांच्या विकासासाठी,कल्यानासाठी विविध योजना तयार करते. १५,१२२ योजना फेब्रुवारी २००६ पर्यत तयार झाल्या. अनुलोम म्हणजे अनुगामी लोकराज्य महायोजना विविध शासनाच्या योजना आहेत,जसे शेतकरीचा अपघाती मृत्यु झाल्यास त्याला काही शासकीय लाभ होऊ शकतो पण त्यासाठी त्याच्या शेतीचा सातबारा त्याच्याच नावावर असला पाहीजे.

वनविभागाच्या काही सुविधा,योजना आहे ज्या शेतक-याच्या हिताच्या आहे. अनुलोम ही संस्था १ जुलै २०१६ रोजी अस्तित्वात आली.यामध्ये मुख्यतः कृषी,आरोग्य व रोजगार यावर भर टाकण्यात आला. तसेच श्री लांजेवार यांनी 'शेकरु ॲप' 'कौशल्य विकास योजना' वउदयोग क्षेत्रातील 'मुद्रा लोन योजना' अशा विविध योजना सर्व शिबिरार्थीना व उपस्थित गावक-याना सांगीतले.

प्रा. अमर कुरील यांनी अनुलोम याचा विचार,गरज व उपयोगीता सांगीतले. शासन सर्व सामान्य लोकांसाठी विविध योजना आखते पण ते लोकांना माहीत नसल्यामुळे त्या योजना विफल ठरतात. तसेच त्यांनी 'अनुलोम ॲप' हे गावक-याना व शिबिरार्थीना त्याच्या मोबाईल फोन मध्ये डाऊनलोड करुन घेण्यास सांगितले व शासकीय योजनेत जनसहभागाची साथ आवश्यक असल्याचे सांगीतले.

श्री लांजेवार व त्यांच्या एका सहकां-यानी 'अनुलोम'अॅप चे डाउनलोड प्रत्यक्षीक करुन दाखविले व शिबिरार्थी व गावकं-यानी ते अंगीकारले .

या कार्यक्रमाचे संचालन जयंत भोपये आणि आभार प्रदर्शन प्रतिक मेश्राम यांनी केले.




**'शासकीय योजनांना जनसहभागाची साथ' या विषयावर व्याख्यान देताना श्री.संजय लांजेवार**

- **रविवार, दिनांक ०३ डिसेंबर २०१७ : 'व्याख्यान'**

दुपारच्या दुस-या सत्रांत डॉ.अशोक कळंबे,सहयोगी प्राध्यापक रसायनशास्त्र विभाग यांचे 'शारिरीक सुदृढता आणि विद्यार्थी जीवन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.डॉ कळंबे सर यांनी मानवाच्या जिवनात एखाद्या गोष्टीमुळे सकारात्मक परीवर्तन होऊ शकतो. विद्यार्थ्याचे शालेय जिवन आणि सुदृढता यांची योग्य सागंड घातल्यास सुदृढ,निरोगी शरीरात एक चांगले निरोगी विचार सुध्दा येतात. निरोगी शरिर हे सकारात्मक कार्याचे आणि विचाराचे प्रतिक आहे.मानवी जिवनात आरोग्य संपत्ती हि श्रेष्ठ संपत्ती आहे.पैसा आहे म्हणजे आरोग्य निरोगी आहे असे होत नाही. उदा. एखादा शेतकरी क्विचितचं त्याला शारीरीक व्याधी,समस्या निर्मान होतात या उलट श्रीमंत व्यक्तीना आरोग्य विषयक समस्या असल्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसुन येते. उदा : रक्तदाब,मधुमेह,संधीवात, हदयाचे विकार आणि इतर.

आजच्या दगदगीच्या जिवनात स्वतःला विसरता कामा नये. विद्यार्थी जिवनात व्यायाम व खेळ याची आवड निर्मान करायला हवी. त्यासाठी त्याचे भविष्यकालीन फायदे समजावे. मानसीक व शारीरीक आरोग्य उत्तम असण्यासाठी कार्यरत असावे. योग्य आहार,व्यायाम,निद्रा, विचार, कार्य आवश्यक आहे. स्वताच्या प्रगतीतुन घराची, समाजाची व देशाची प्रगती अवलंबून असते. स्वताचा मनावर योग्य ताबा असायला हवा, एखादी योग्य गोष्ट साध्य करण्याची मानसिकता व मेहनत पाहीजे. व्यायाम व खेळ यांचे महत्व सुध्दा शिबिरार्थींना पटवून सांगीतले.

या व्याख्यानासाठी डॉ.दुधे सर, विभाग प्रमुख भौतिकशास्त्र हे प्रमुख अतिथि म्हणुन उपस्थित होते. प्रा. कुरील यांनी विद्यार्थाना आपल्या दैनदिंन जिवनात योग्य दिनचर्या ठेउन व्यायामाची व एखाद्या खेळाची सांगड घालावी असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे संचालन अक्षय मोहुर्ले आणि आभार प्रदर्शन धनश्री गोळे यांनी केले.





**'शारिरीक सुदृढता आणि विद्यार्थी जीवन' या विषयावर व्याख्यान देतांना डॉ.अशोक कळंबे**

## रविवार, दिनांक ०३ डिसेंबर २०१७: 'वादविवाद स्पर्धा' (मध्यान्न बौध्दिक सत्र)

शिबिरार्थ्यासाठी दुपारच्या सत्रांत 'नोट बंदी योग्य की अयोग्य' या विषयावर 'वादविवाद स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.अमर कुरील,रासेयो कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये सर्व शिबिरार्थीनी उत्स्फृत प्रतिसाद दिला व गावक-यांनी सुध्दा सहभाग नोंदविला.

दिनांक ०८ नोव्हेंबर २०१६ च्या रात्री ८:०० वाजल्यापासुन भारताचे माननिय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजीनी पुर्ण देशात ' नोटबंदी' ची घोषणा केली, त्यामुळे जुन्या चलनातील ५०० आणि १००० च्या नोट चलनातून बाद झाल्या व त्यांचा परीणाम संपुर्ण देशात विविध योग्य- अयोग्य प्रतिक्रीया उमटल्या. सामान्य मानसांची प्रतिक्रीया सुध्दा नोंदविण्यात आल्या.

वादविवाद स्पर्धेत सदर विद्यार्थ्यानी विषयाच्या बाजुने व विरुध्द अशा दोन्ही ठिकाणी आपआपले विचार व्यक्त केले. त्यामध्ये सामान्य मानसाच्या जिवनात आलेल्या तात्कालीन समस्या, त्रास, बॅंकेचे व्यवहार,सामान्य व्यवहार, नोट बदल, सुटे चलन, लग्नकार्य समारंभ, जरुरी व्यवहार,खरीदारी इत्यादी विविध बाबीवर समर्पक मते मांडली. तसेच काळा पैसा,भ्रष्ट्राचार,घुसखोरी,आंतकवाद,नक्षलवाद,जमखोरी यांची पैलुसुध्दा मांडले. नोटबंदी नंतर या समस्याना कशा प्रकारे आळा बसेल यावर सुध्दा प्रकाश टाकला

अध्यक्षिय स्थानी असलेले प्रा. कुरील सर यांनी ठळकपणे दोन्ही बाजुचे योग्य विश्लेषण केले. त्यांनी या काळात सर्व जनमानसांना झालेल्या मानसीक,शारीरीक त्रासाचे, समस्याचे थोडक्यात आढावा घेतला. पण तसेच माननीय मोदींजीच्या मुख्य लक्ष काळा पैसा,भ्रष्ट्राचार,घुसखोरी,आंतकवाद,नक्षलवाद,जमखोरी समस्यावर भविष्यकालीन उपाय ठरेल अशी सकारात्मक आशा स्पष्ट केले.

एखाद्या मोठया बदलासाठी थोडा त्रास सहन करावा लागतो, नोटबंदीचे दुरगामी परीणाम हे भारत देशाच्या सर्व जनतेसाठी योग्य असेल, त्याचा भारतीय अर्थव्यावस्थेवर काहीही विपरीत परीणाम होणार नाही .नोटबंदीची योग्य उद्दीष्टे साध्य होतील अशी आशा बाळगली .

या कार्यक्रमाचे संचालन सुर्यकांत बारसागडे आणि आभार प्रदर्शन रोशनी मंडल यांनी केले.







**'नोट बंदी योग्य की अयोग्य' या विषयावर वादविवाद स्पर्धेत उपस्थित शिबिरार्थी**

- **सोमवार, दिनांक ०४ डिसेंबर २०१७ : ‘व्याख्यान’**

आज दुपारच्या पहील्या सत्रांत प्रा. अविनाश पंधरे,सहा.प्रा.(इंग्रजी) आंनद निकेतन महाविद्यालय,वरोरा यांचे ‘रासेयो आणि व्यक्तीमत्व विकास’ या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.अमर कुरील,रासेयो कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.आज शिबिरात एक अतिशय महत्वाचा दिवस उजाळला ज्यामध्ये ‘महाराष्ट्र शासनाचे ’ उत्कृष्ट रा.से.यो.पथक पुरस्कार प्राप्त करणारे आनंद निकेतन महाविद्यालय,वरोरा जिल्हा चंद्रपुर चे प्रा. अविनाश पंधरे,रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या व्याख्यानाचे योग.

हा योग सर्व शिबिरार्थ्यासाठी विविध माहीती व रासेयोचे महत्व पटवुन देणारा ठरला ज्याचे मुख्य लक्ष ‘व्यक्तीमत्व विकास’ हे होते. प्रा. पंधरे यांनी व्यक्तीमत्व व रासेयो चा दोन वर्षाचा कालावधी यांच्या द्वारे आपण आपल्या आयुष्यात काय साध्य करु शकतो याची प्रचिती सांगीतली.

मनुष्याच्या जिवनात जेव्हा अनेक गोष्टी,पैलु एकत्र येतात तेव्हा एखादी ‘संकल्पना’ निर्मान होते. व्यक्तीमत्व म्हणजे एक संघटन सुचक आहे. व्यक्तीमत्वाचे महत्वाचे पैलु-आत्मविश्वास,सकारात्मक दृष्टीकोन, संभाषण कौशल्य, वक्तृत्व कला, वेळेचे नियोजन, कार्यक्षमता असे प्रा.पधंरे यांनी सागीतले. ज्यामध्ये सर्वात महत्वाचा पैलु म्हणजे ‘आत्मविश्वास’ होय. सकारात्मक दृष्टीकोन ठेवला नाही तर आत्मविश्वास येनार नाही, त्यामुळे आपले विचार हे सकारात्मक असले पाहीजे. परिस्थीतीची तक्रार कधी करायची नाही. आपल्या वागण्यात बोलण्यात योग्य सकारात्मक बदल केला पाहीजे. ते विचार दुस-यापुढे मांडता यायला पाहीजे.एखादे योग्य मत मांडण्याचे धाडस आपल्यामधे असले पाहीजे. समर्पित भावनेने एखादे काम करायला हवे. रासेयो ची दोन वर्षे स्वयंसेवक म्हणुन तुमच्यात काय सकारात्मक बदल होतो, पुर्वी आणि नंतर यांची तुलना तुम्हीच ठरवा अणि तुमच्या उणिवा आणि तुमची शक्ती यांच्यावर आढावा घ्या .

प्रा.कुरील यांनी पधंरे सर यांनी केलेल्या योग्य, सकारात्मक व व्यक्तीमत्व विकासाबाबतच्या केलेल्या व्याख्यानाचे गुढ शिबिरार्थ्यांना त्यांच्या भावी जिवनावर फार उपयोगी व महत्वाचे आहे असे सांगितले.तसेच एका शब्दात शिबिरात व्याख्यानासाठी होकार दिल्याबद्दल व इतक्या लांबुन येण्याबद्दल प्रा.पधंरे सर यांचे व्यक्तीशः आभार मानले.

या कार्यक्रमाचे संचालन कु.दिप्ती सहदेवकर आणि आभार प्रदर्शन कु. मेघना बंडीवार यांनी केले.






**रासेयो आणि व्यक्तीमत्व विकास या विषयावर व्याख्यान देतांना प्रा.अविनाश पंधरे**







**' रासेयो आणि व्यक्तीमत्व विकास' या विषयावर व्याख्यान**

- **सोमवार,दिनांक ०४ डिसेंबर २०१७: चर्चासत्र (मध्यान्न बौध्दिक सत्र)**

दुपारच्या सत्रांत विद्यार्थ्यांसाठी 'सामाजीक माध्यमाचा वापर' या विषयावर एक वक्तृत्व स्पर्ध्येचे आयोजन करण्यात आले.वॉटस्अप,फेसबुक,इन्स्टाग्राम,वर्तमानपत्रे,यु टयुब अशा विविध साधनांचा समावेश होतो व आजच्या काळात ९० टक्के पेक्षा जास्त भारतदेशातील युवा कधीना कधी, कुठे कोणत्या तरी कारणांनी यांचा वापर करतात. ज्यामध्ये विद्यार्थी व्यक्ती आपल्या विचारांची देवान-घेवान करतो, मनोरजंनाचा वापर,संगीताची आवड असलेली व्यक्ती,एखादी आवश्यक सुचना माहीती, जाहीरात,चालु घडामोडी,सामान्यज्ञान, विविध विषयाचे गोष्टीची संकल्पना याविषयी माहिती मिळण्यास मदत मिळते.पण सोबतच सामाजीक माध्यमाचा वापर हा कसा व्हायला हवा कोणत्या कारणांसाठी, केव्हा व कसा असायला हवा, किती वेळ दयालया हवा यावर सर्व शिबिरार्थीनी आपले विचार मांडले.

प्रत्येक शिबिरार्थीनी या चर्चा सत्रात भाग घेतले व आपआपले मत मांडले.प्रा.अमर कुरील यांनी सामाजीक माध्यमाचा वापर करतांना त्याचा योग्य वापरच करायला हवे असे आवर्जुन सांगीतले. वेळेचे विशिष्ट नियोजन पाळायला हवे.योग्य गोष्टीचा प्रचार व प्रसार असल्यास आवश्यक करावा व कुठल्याही पोष्ट/गोष्टीचा परीणाम वाईट, समाज विघातक ,मन दुखविणारे,समस्या निर्माण करणारे नसावे.या गोष्टीचा भान ठेवायला हवे. सामाजीक माध्यमात होरपळुन जायला नव्हे, ते आपल्या साठी आहे आपण त्याच्यासाठी नाही. आपल्या मोबाईल मध्ये केवळ विद्यार्थी जिवनात कामी येणारे ॲपडॉउनलोड करावे, अनावश्यक ॲप डाऊनलोड करु नये, त्याची सवय लावून घेवु नये. तसेच 'सायबर गुन्हा' यावर सुध्दा प्रा.कुरील यांनी प्रकाश टाकला. सामाजीक माध्यमातुन 'सायबर गुन्हा' होतो जो दुस-या एखाद्या व्यक्तीला हाणी पोचविणारा असेल,समाजात समस्या निर्मान करणारा असेल त्यासाठी संविधान विशिष्ट कायदयाची नोंद आहे. याचा भान ठेवायला हवा असे सांगीतले.

या कार्यक्रमाचे संचालन सचिन वाळके आणि आभार प्रदर्शन मेघना बंडीवार यांनी केले.







**'सामाजीक माध्यमाचा वापर' या विषयावर वक्तृत्व स्पर्ध्येत उपस्थित शिबिरार्थी**

- **मगंळवार, दिनांक ०५ डिसेंबर २०१७ : 'व्याख्यान'-०१**

आज दुपारच्या पहील्या सत्रांत डॉ. योगीता सानप ,सहा.प्राध्यापीका (गृह विज्ञान) कृषी विज्ञान केंद्र गडचिरोली यांचे 'आदीवासी महीला आणि पोषण' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.अमर कुरील,रासेयो कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.

डॉ.योगीता सानप मॅडम यांनी महीला आहारात विविध पोषक मुलद्रव्ये म्हणजे प्रथिने, कर्बोदके आणि वसा यांचे महत्व सांगीतले. शरीराचा महत्वाचा भाग म्हणजे 'मेंदु' त्याला ग्लुकोज मिळाल्याशिवाय तो जागृत होत नाही. जेवणात सहा रस असतात-गोड रस,खारट रस, तुरट रस, आंबट रस, कडू रस त्यांनी विविध विटामिन त्यांची आवश्यकता याचा वर सुध्दा मार्गदर्शन केले. महीलांनी आपल्या जबाबदा-या सोबत आपल्या आरोग्याचा सुध्दा विचार करायला हवा, असे प्रतिपादन केले. वैद्यकीय सेवा त्यांची आवश्यकता व फायदे सुध्दा सांगीतले. शहरी वातावरणा पेक्षा ग्रामीण वातावरण हे फारच उपयोगी,प्रदुषन मुक्त आणि स्वछ हवेशिर असते. त्यांला योग्य आहार व वैद्यकीय ज्ञान याची सांगड घातली की आरोग्य उत्तम असण्यास मदत मिळते, असे डॉ. सानप मॅडम यांनी सांगीतले.

प्रा.कुरील यांनी सुध्दा वर्तमान पत्रे, सामाजीक माध्यमे आणि मोबाईल याच्यावर येणा-या विविध महीला उपयोगी योजना,माहीती, स्वास्थ सेवा केंद्र यांचा पुर्णपणे वापर करावा आणि फायदा घ्यावा असे सांगितले. तसेच प्रत्येक ऋतूमानातील येणारे निसर्गतः उपलब्ध होणारे फळे,पालेभाज्या यांचे सेवन करावे यावर भर दिली.

या कार्यक्रमाचे संचालन जयंत भोपये आणि आभार प्रदर्शन अक्षय मोहूर्ले यांनी केले.






**'आदीवासी महीला आणि पोषण' या विषयावर व्याख्यान देतांना डॉ.योगीता सानप**

- **मगंळवार, दिनांक ०५ डिसेंबर २०१७ : 'व्याख्यान'-०२**

आज दुपारच्या दुस-या सत्रांत श्री.अखिलेश मिश्रा,नेहरु युवा केंद्र गडचिरोली यांचे 'स्वामी विवेकानंद याचे विचार ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.अमर कुरील,रासेयो कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.

श्री. अखिलेश मिश्रा यांनी स्वामी विवेकानंद यांची एक आदर्श विद्यार्थी म्हणुन ओळख करुन दिली. यांचे पुर्ण नाव नरेंद्र दत्त होते.ते विचारांचे महान चितंन करणारे होत, त्याचे वडील पेशाने वकील होते आणि त्यांचे गुरु रामकृष्ण परमहंस होते. स्वामीजींनी वर्ष २०२० मध्ये भारतात युवांचे वर्चस्व राहील असे अगोदरच सांगीतले होते. स्वामीजींचे विचार हे जगातील प्रत्येक युवासाठी मार्गदर्शनाचे कार्य करतात, ते युवकांचे प्रेरणास्थान आहेत. आपल्या अत्यल्प आयुष्यात त्यांनी फार मोठे कार्य केले. स्वामीजी कोणत्याही एका विशिष्ट धर्माचे प्रर्वतक नव्हते, त्यांनी जगातील विविध धर्माचा अभ्यास केला. ते मानव धर्माचे समर्थक होते. मानव सेवा ही श्रेष्ठ सेवा आहे कोणत्याही धर्माची वाईट शिकवण नाही. योग्य विचार करण्याची आवश्यकता, त्याचा प्रचार-प्रसार व्हायला हवा , शिकागो मध्ये १८५३ ला झालेल्या सर्व धर्म संम्मेलनात त्यांनी भारताचे नेत्तृत्व केले, पुर्ण जगात भारताचे नाव लौकिक केले आणि युवकांना मार्गदर्शन केले. संम्मेलनात 'माझे बंधु आणि भगीनींनो' हे उद्‌गार कायमस्वरुपी तेथील सर्व लोकांच्या हदयावर उमटले.त्यांनी सर्व जगासाठी मानवता, भाईचारा,बंधुप्रेम व शांततेची शिकवन दिली. विवेकानंदजीच्या विविध जिवन पैलुवर प्रकाश टाकला.

प्रा. कुरील संरानी स्वामीजीच्या मठात शक्य झाल्यास भेट देण्याचे सांगीतले, जेनेकरुन त्यांच्या विचारांची उर्जा आपल्याला सुध्दा मिळेल. स्वामीजीचे जिवन कार्य, चरित्र वाचण्यास सांगितले व त्यांच्या या महान जिवन कार्याला मान देत भारत सरकारने १२ जानेवारी या दिवसाला ' राष्टीय युवा दिन' म्हणुन साजरा करण्याचे घोषीत केले, १२ जानेवारी स्वामीजींचे जन्म दिवस आहे.स्वामीजी नेहमी युवकांचे प्रेरणास्त्रोत राहील असे सांगितले.

या कार्यक्रमाचे संचालन सचिन वाळके आणि आभार प्रदर्शन निकेश भरणे यांनी केले.







**'स्वामी विवेकानंद याचे विचार' या विषयावर व्याख्यान देतांना श्री.अखिलेश मिश्रा**

- **बुधवार, दिनांक ०६ डिसेंबर २०१७ : 'निरोप समारंभ'**

गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली आणि शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली यांच्य संयुक्त विद्यामाने आयोजीत ग्राम विकासाकरीता- 'युवाशक्ती 'या संकल्पने वर आधारित 'राष्ट्रीय सेवा योजना च्या महाविद्यायीन विशेष शिबिराचे आयोजन स्थळ- जिल्हा परीषद उच्च प्राथमिक शाळा,येवली तालुका,गडचिरोली-जिल्हा गडचिरोली येवली इथे करण्यात आले होते व या शिबिराचा अंतिम टप्पा म्हणजे 'निरोप समारंभ.

सात दिवसीय महाविद्यालयीन विशेष शिबिर ग्राम विकासाकरीता 'युवाशक्ती' या शिबिराचा निरोप समारंभ दि.०६/१२/२०१७ रोजी आयोजीत करण्यात आला.सदर कार्यक्रमाची सांगत डॉ.नरेश मडावी रासेयो सम्न्वयक गोंडवाना विद्यापिठ,गडचिरोली यांच्या शुभ हस्ते करण्यात आली.अध्यक्षिय स्थानी डॉ.सी.एम.दुधे भौतिकशास्त्र विभाग प्रमुख,डॉ.अशोक कळंबे,प्रमुख अतिथी आणि प्रा.अमर कुरील,रासेयो कार्यक्रम अधिकारी तसेच श्रीमती प्रितीताई बारसागडे,श्री मोरेश्वर भांडेकर,ग्रामपंचायत सदस्य आदी मंडळी मंचावर उपस्थीत होती

०६ डिंसेबर म्हणजे महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा 'महापरीनिर्वान दिन'.सर्वप्रथम बाबासाहेबांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवराच्या व शिबिरार्थीच्या वतीने पुष्पअर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सदर शिबिराच्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

निरोप समारभंच्या कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा.अमर कुरील यांनी केली.शिबिरार्थीनी या सात दिवशीय शिबिरात केलेल्या कार्याची उजळणी केली.जि.प.शाळा परीसर स्वच्छता,गाजर गवत निर्मुलन,स्वच्छता अभियान,प्राथमिक आरोग्य केंद्र परीसराची स्वच्छता,वनराई बंधारा,गाव चौक स्वच्छता,बेटी बचाओ-बेटी पढाओ आंदोलन अभियान व इतर यांचा समावेश होता.

तसेच विद्यार्थ्यानी सहभाग दर्शविलेल्या बौध्दिक कार्यक्रम,व्याख्यान,चर्चासत्र,वादविवाद,वक्तृत्व स्पर्धा व खेळ संत्रात स्वतःला सामिल केले व आपले पुर्ण योगदान दिले. शिबिर यशस्वी होण्यासाठी जि.प.शाळा,येवली,ग्रामपचांयत येवली,आणि शिबिरासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य करणा-या सर्व मान्यवराचे आभार आणि सर्व शिबिरार्थ्याचे सुध्दा आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ.कळंबे सर यांनी सुध्दा सर्व शिबिरार्थी त्याच्या या अत्यल्प दिवसात केलेल्या मोलाच्या कार्याबद्दल प्रशंसा केली व त्यांना इतराच्या सुध्दा समस्या ध्यानी घेऊन समाजासाठी काही कार्य कोणत्या ना कोणत्या रुपात सतत करण्याचे आव्हान केले.

डॉ.मडावी यांनी सर्वप्रथम सर्व शिबिरार्थ्याचे कौतुक करुन आभार मानले.त्यांनी शिबिराच्या माध्यमातुन पाच-सहा दिवस का होईना काहीतरी दत्तक गावात विधायक आणि सामाजीक सकारात्मक गोष्टीचा पाया रुजवला.समाजाप्रती रासेयो माध्यमातुन सामाजिक बांधीलकी जपली हिच सेवाभाव. फक्त शिबिर कालावधीसाठी न वापरता अख्या आयुष्यात जपायला सांगितले व दिन विशेष म्हणजे भारत देशाच्या समाज सुधारनेसाठी डॉ. बाबासाहेबांच्या अमुल्य कार्याची थोडक्यात आठवण करुन दिली.

अध्यक्षीय स्थानी असलेले डॉ. दुधे सर यांनी सुध्दा शहराच्या विकासासोबत गावाच्या समस्या यांवर ही लक्ष देण्यास व सोडविण्यास रा.से.यो.च्या माध्यमातुन शिबिरार्थ्यानी कसे करावे हे सांगीतले. शिबिरार्थ्याच्या कार्याची प्रशंसा केली व नेहमी आपल्या आयुष्यात मानवता जपण्याचा संदेश दिला.या सदर निरोप समारंभात श्रीमती प्रितीताई बारसागडे यांनी केलेल्या विशेष सहकार्य बद्दल उपस्थीत सर्व मान्यवरांच्या हस्ते त्यांचे विशेष सत्कार करण्यात आला.

श्रीमती प्रितीताई बारसागडे या मागील वर्षापासुन नेहमी मदतीस तयार चोविस तास शिबिरार्थ्यासाठी झटल्या, त्यांनी प्रत्येक वेळी योग्य सहकार्य केले व मानुसकीची शिकवण त्यांनी सर्वांना यावर्षी सुध्दा दिली.त्यानी सर्व शिबिरार्थ्यांचे व कार्यक्रम अधिकारी यांना गावात केलेल्या या विधायक कार्याबद्दल धन्यवाद दिले.

या कार्यक्रमाचे संचालन सुर्यकांत बारसागडे व आभार प्रदर्षन कु.रोशनी मडंल यांनी केले.





**महाविद्यालयीन शिबिराच्या निरोप समारंभ प्रंसगी उपस्थित मान्यवर**





**महाविद्यालयीन शिबिराच्या निरोप समारंभ प्रंसगी उपस्थित अध्यक्षीय स्थानी डॉ.दुधे सर**

- **गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर २०१७: 'प्रस्थान'**

रासेयो कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयीन पथकाचे सर्व शिबिरार्थी इतर आवश्यक सामान साधन सामुग्री सोबत घेउन शिबिर स्थळ –येवली वरुन मुख्यालय गडचिरोली इथे सकाळी ११:०० वाजता रवानगी.

- **महत्वपुर्ण कार्य:**

१) गाजर गवत निर्मुलन अभियान

२) स्वच्छता मोहीम

३) निवासी शाळेतील परिसर स्वच्छता

४) दत्तक गावात नदीवर बंधारा बांधला

५) शासकीय योजनाचा प्रचार आणि प्रसारात मदत

६) रेलीचे आयोजन

- **दैनंदिन कार्यक्रम:**

१) योगा व कवायत

२) सामुहिक प्रार्थना

३) अल्पोपहार

४) श्रमदान

५) भोजन

६) व्याख्यान

७) चर्चासत्र

८) खेळसत्र

९) सांस्कृतीक कार्यक्रम

## ‘महाविद्यालयीन विशेष शिबीरातील काही विशेष कार्य



निवासी शाळेतील स्वच्छता




रासेयो पथकाची गावातील प्रभात फेरी



गाजर गवत निर्मुलन



दत्तक गावतील स्वच्छता मोहीम





दत्तक गावात नदीवर बंधारा बांधताना रासेयो शिबिरार्थी





सामुहिक प्रार्थना करतांना शिबिरार्थी

सामुहिक भक्ती गीत म्हणतांना शिबिरार्थी



योगा सत्र



स्वयंपाक करतांना शिबिरार्थी




दत्तक गावात रेलीचे आयोजन



गावातील मुख्य चौकाची स्वच्छता





श्रमदान

परिसर स्वच्छता मोहीम






मध्यान्न भोजन

कवायत सत्र





खेळसत्र

अल्पोपहार बनवितांना शिबिरार्थी

# ‘सांस्कृतिक कार्यक्रम’



अंधश्रद्‌धा निर्मूलन नाटकाचे सादरीकरण



गावकऱ्यांचा सहभाग




गोंडी नृत्य करतांना शिबिरार्थी



शासकीय योजनाचा प्रचार आणि प्रसारात मदत



श्रीमती प्रितीताई बारसागडे यांचा सत्कार




श्रमदानासाठी शिबिरार्थ

लोकमत
हॅलो गडचिरोली
शनिवार, दि. १६ डिसेंबर २०१७



# शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठ व राष्ट्रीय सेवा विभाग, शासकीय विज्ञान महाविद्यालय गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्राम विकासाकरिता- युवा शक्ती' या संकल्पनेवर आधारित सात दिवसीय महाविद्यालयीन विशेष शिबिराचे आयोजन येवली येथे जि. प. शाळेत करण्यात आले. शिबिराच्या समारोपाला रासेयो समन्वयक डॉ. नरेश मडावी, डॉ. सी. एन. दुधे, प्रा. अमर कुरील, डॉ. अशोक कळंबे, येवलीच्या सरपंच गीता सोमनकर, मोरेश्वर भांडेकर, डॉ. अबरार, डॉ. पैगनकर उपस्थित होते. प्रास्ताविकेतून प्रा. कुरील यांनी शिबिराचे आयोजनाची भूमिका विशद केली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. नरेश मडावी म्हणाले, युवाशक्ती हाच परिवर्तनाचा प्रवाह आहे. रासेयोच्या माध्यमातून सामाजिक दायित्व जाणून यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी प्रीती बारसागडे यांचा सत्कार करण्यात आला. संचालन सूर्यकांत बारसागडे तर आभार रोशनी मंडल यांनी मानले.